

# कवितेच्या गावा

कुमारांसाठी
कवितासंग्रह




'छात्र प्रबोधन' मधील निवडक कवितांचा संग्रह - २

* संपादन *

**नीलिमा करमरकर**

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०.

('छात्र प्रबोधन' मधील निवडक कवितांचा संग्रह-२)

© स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन

* प्रकाशक व मुद्रक
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, 'छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.

* अक्षर जुळणी
छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.

* मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट
रेश्मा बर्वे

* प्रथम आवृत्ती
सौर श्रावण, शके १९२६ (ऑगस्ट २००४)

* किंमत
रु. ३०/-

**(Compilation of Poems from ' Chhatra Probodhan')**

# मनोगत

*‘कविता म्हणजे तृणावरची किलबिल कोवळी उन्हे असतात,*
*सृजनाच्या पहाटेची ओली ‘अक्षरस्वप्ने’ असतात.’*

अशी ही ‘अक्षरस्वप्ने’ अनुभवण्यासाठी कवितावाचनाची गोडी लागण्याचं एक वेडं वय असतं. शालेय दिवसातच कवितेची गोडी लागली तर आयुष्यभरासाठी एक आनंदाचा ठेवा आपल्याला मिळतो.

बरेचदा शाळेत मराठीच्या तासाला आपण कविता शिकतो, कंटाळून अभ्यासतो; पण तिचं सौंदर्य आपल्या मनाला भिडत नाही. कविता अशा नीरसपणे अभ्यासणं यासारखा करंटेपणा नाही.

खास कुमारांसाठी त्यांच्या भावविश्वाशी नातं जोडणाऱ्या कविता ‘छात्र प्रबोधन’ मधून अगदी सुरुवातीपासून देत आलो आहोत, त्यातील निवडक कवितांचे दोन कवितासंग्रह तपपूर्तीनिमित्ताने प्रकाशित करीत आहोत. त्यांपैकीच ‘कवितेच्या गावा’ हा दुसरा कवितासंग्रह !

कै. शांता शेळके, मंगेश पाडगावकर, वि. म. कुलकर्णी, दत्ता हलसगीकर यांच्यासारख्या वयानं ज्येष्ठ तरीही कुमारांच्या भावविश्वात डोकावण्याची कोवळीक जपणाऱ्या कवींपासून ते खास कुमारांसाठी आवर्जून लेखन करणाऱ्या आश्लेषा महाजन, संगीता बर्वे, कल्याण इनामदार यांच्यासारख्या ताज्या दमाच्या अनेक कवींनी ‘छात्र प्रबोधन’ साठी कविता लिहिल्या. इंद्रजित भालेराव, फ. मुं. शिंदे यांसारख्या कवींच्या कवितेत ग्रामीण जीवनाचं प्रतिबिंब प्रतीत झालं. रेणू पाचपोर, कै. बजरंग सरोदे, किशोर पाठक इ. महाराष्ट्रभरातल्या वेगवेगळ्या भागातील कवींनी आपल्या कविता आवर्जून पाठवल्या.

आशय आणि विषयांचं खूप वैविध्य या कवितांतून आढळते. निसर्गाचे विविध विभ्रम शब्दांत पकडणाऱ्या निसर्गकविता, मुलांच्या भावविश्वाचे चित्रण

करणाऱ्या भावकविता कुमारमनाला भावतील अशाच आहेत. परीक्षा, पेन यांसारख्या मुलांच्या जिव्हाळ्याच्या गोष्टी जेव्हा कवितेत येतात तेव्हा त्या कविता अगदी खास मुलांच्याच होऊन जातात. याखेरीज काही व्यक्तिचित्रात्मक कविता, राष्ट्रभ तिपर गीतं, विज्ञान गीतं, संस्कार गीतं, यांचाही समावेश या संग्रहांतून केला आहे.

रचनेचंही असंच वैविध्य येथे तुम्हांला आढळेल. छंदबद्ध, वृत्तरचनेतील कविता, मुक्तछंदातील कविता, चाल लावून म्हणण्यासारख्या गेय कविता ! अगदी ओवीपासून वृत्तछंदापर्यंत रचनेचे वैविध्य या संग्रहातील कवितांमध्ये आहे. गेली अनेक वर्षे कुमारांनी स्वतःचे उत्तम लेखन 'छात्र प्रबोधन' साठी पाठवावे, वर्षातून एखादा अंक खास मुलांच्याच लेखनाचा असावा ही परंपरा सुरू झाली त्यातून अगदी कौतुक वाटावं अशा सुरेख कविता मुलांनीही लिहिल्या. त्यांचा आवर्जून या संग्रहांमधून समावेश होत आहे; कारण हे सर्व उद्याचे कवी आहेत.

या सुंदर कवितांच्या साथीने तुम्हांला 'कवितेच्या गावा' घेऊन जाण्यासाठी या पुस्तकांचा प्रपंच ! लहानपणी मनात ठसलेल्या कविता प्रौढपणी त्या वाटेने परत जाताना स्मरणातून जाग्या होतात. प्रत्येक वळणावर एक ओळखीचे झाड दिसावे तशा कविता स्पष्ट दिसतात. 'अक्षरबोली'शी सर्वार्थानं परिचित व्हायचं असेल तर कवितेसारखं दुसरं माध्यम नाही. म्हटलं तर कविता मितभाषी असते, म्हटलं तर खूप काही सांगणारी! वाचणाऱ्याला फक्त तिची बोली समजायला हवी. त्यासाठी मन संवेदनशील हवं. मग ती कुठेही तुम्हांला भेटते. अगदी एखादं गाणं ऐकतानासुद्धा ती आनंद देऊन जाते. आजच्या युगात तर ही आस्वादक वृत्ती आवर्जून जपली नाही तर विद्या, धन, कीर्ती, प्रगती या सर्व गोष्टी मिळाल्या तरी आत्म्याच्या आनंदाला कुमारवाचकांनी पारखं होऊ नये म्हणून, 'छात्र प्रबोधन' मधून गेल्या १२ वर्षांत प्रकाशित झालेल्या कवितांचे हे दोन संग्रह 'अक्षरबोली' आणि 'कवितेच्या गावा' खास तुमच्यासाठी.

सर्वच कवींनी आपल्या कविता काव्यसंग्रहांत समाविष्ट करण्यासाठी आनंदाने संमती दिली, याबद्दल मनःपूर्वक आभार !



– नीलिमा करमरकर

अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | पर्व ये नवे ! | शांता ज. शेळके |
| २ | असे होईल का? | सरिता पदकी |
| ३ | मनाचा अभंग | फ. मुं. शिंदे |
| ४ | लिहू कशावर कविता | संजीवनी मराठे |
| ५ | कधी न रुसावे... | संगीता बर्वे |
| ६ | आनंदाच्या रंगीत डोही | प्रवीण दवणे |
| ७ | चला | किशोर पाठक |
| ८ | दीपकळी | बजरंग सरोदे |
| ९ | पुस्तकं | अनुवाद - ज्योती सुभाष |
| १० | जय विज्ञान | राजलक्ष्मी देशपांडे |
| ११ | अश्राप | सुहासिनी देशपांडे |
| १२ | दिव्यत्वाची पटते खूण | डॉ. शंतनू चिंधडे |
| १३ | रविवार | इंद्रजित भालेराव |
| १४ | थकून गेली आई | दत्ता हलसगीकर |
| १५ | पंख पसरुनी विहरे त्याला | राम डिंबळे |
| १६ | वाचता वाचता | कल्पना पुरंदरे |
| १७ | साद घाली रानवारा | शांता ज. शेळके |
| १८ | वसंतऋतुचे गाणे | डॉ. वि. म. कुलकर्णी |
| १९ | गिर्यारोहण करता करता... | आश्लेषा महाजन |
| २० | हे नव्हे चांदणे | शंकर रामाणी |
| २१ | वहीचं शेवटचं पान | कल्याणी शु ल |
| २२ | शेवटचा साथी | वसंत जोशी |
| २३ | घरघरतंय गं जातं | हिराबाई घोंघे |
| २४ | हा परिसर करूया हिरवा | डॉ.धुंडिराज कहाळेकर |
| २५ | कविता शहाण्या प्राण्यांची | कल्याण इनामदार |
| २६ | पालखी | संजीवनी बोकील |
| २७ | बाळाची तक्रार | प्र. वै. लासुरे |
| २८ | नवशतकाचे गाणे | लक्ष्मीकांत तांबोळी |

| | | |
|---|---|---|
| २९ | त्यांचीही थोडीशी सय ठेवू | सुजाता पाटील |
| ३० | कळी | रेणू पाचपोर |
| ३१ | प्रतिभेचे पिंपळपान | डॉ. अरविंद लेले |
| ३२ | पावसातली परी | श्रीकृष्ण पोतदार |
| ३३ | शहीद होउनि आलो आई | प्रभाकर महाजन |
| ३४ | ऐक सखे.... | प्रतिमा जोशी |
| ३५ | ज्ञानाची दिशा | ज्ञानोबा खडके |
| ३६ | गाणे आपण गाऊ गं ! | रवींद्र भट |
| ३७ | काय होतं ? | दत्ता हलसगीकर |
| ३८ | आला उन्हाळा... | डॉ. वि. म. कुलकर्णी |
| ३९ | इकडे पाऊस, तिकडे शाळा | आश्लेषा महाजन |
| ४० | झाड मोठं अजबच असतं ! | विद्या प्रभू |
| ४१ | चढुया डोंगर-कडे ! | संगीता बर्वे |
| ४२ | कोका वाजतो वाजतो | रवींद्र भट |
| ४३ | आनंदाचे घर | अनंत भावे |
| ४४ | आभाळवेधी | कल्याण इनामदार |
| ४५ | ऋतू | आश्लेषा महाजन |
| ४६ | अशा एखाद्या दुपारी | बजरंग सरोदे |
| ४७ | आजी | इंद्रजित भालेराव |
| ४८ | बगिचा | किशोर पाठक |
| ४९ | हे गाणे मुक्त मनांचे | अनघा लवळेकर |


## कुमार कवींच्या कविता

| | | |
|---|---|---|
| १ | शाळा एकं शाळा | मानसी मुळ्ये |
| २ | भ्रष्टाचार निंदा स्तोत्रम् | नेहा धर्माधिकारी |
| ३ | राग | पायल लाहोटी |
| ४ | वाच गं घुमा | गायत्री वासनिक |
| ५ | बालमजुरांचा आक्रोश.... | निलेश महाजन |
| ६ | पाश.... | तृप्ती थेटे |
| ७ | एक गाणं स्फुरू पाहतं | प्राज ता आव्हाळ |

‘छात्र प्रबोधन’ची कुमारांसाठी संग्राह्य पुस्तके

## तपपूर्तीची ‘अक्षरभेट’

- ❊ ललित-लेखसंग्रह
  - ❊ **अलगुज** ❊ **केवड्याचं पान**
- ❊ कवितासंग्रह
  - ❊ **अक्षरबोली** ❊ **कवितेच्या गावा**
- ❊ नामवंत कवींच्या काव्याविषयी रसग्रहणात्मक लेखांचा संग्रह
  - ❊ **गंध मोहवी काव्याचा-भाग १ व २**
- ❊ काव्यपं तींचा संग्रह
  - ❊ **शब्दांची रत्ने**
- ❊ कृतिपर पुस्तके
  - ❊ **कला-कौशल्यांच्या दुनियेत**
  - ❊ **कला-कौशल्यांचा उत्सव**
  - ❊ **प्रतिकृतींच्या निर्मितीतून...**
- ❊ भावभावनांशी निगडित लेखांचा संग्रह
  - ❊ **तरंग मनाचे**
  - ❊ **जिद्दीची लोभस रूपं**
- ❊ विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह
  - ❊ **स्वीकारशील स्वदेशी**
  - ❊ **हट्टी व्हा हट्टी !** ❊ **हरित संदेश**

**याशिवाय इतरही अनेक पुस्तके यापूर्वी प्रकाशित झाली आहेत.**



‘कवितेचा गाव’, निसर्गाच्या विभ्रमांनी नटलेला ! भावस्पंदनांनी जिवंत वाटणारा ! अनुभवांच्या विविध रंगांनी समृद्ध असलेला !

कुमारवयातच या गावाची वाट ओळखीची झाली की आयुष्यभरासाठी पुरेल असा आनंदाचा खजिना गवसतो.

कविता म्हटलं तर मितभाषी असते; म्हटलं तर खूप काही सांगणारी ! फक्त तिची ‘अक्षरबोली’ समजायला हवी आणि त्यासाठी मनही संवेदनशील हवं !

विद्या, धन, कीर्ती, प्रगती यामागे धावताना खऱ्याखुऱ्या आनंदाला पारखं होऊ नये यासाठी मुलांच्या भाववि ाशी जवळीक सांगणाऱ्या कवितांचे ‘कवितेच्या गावा’ आणि ‘अक्षरबोली’ हे दोन कवितासंग्रह खास कुमारवयीन वाचकांसाठी !